# ४० लाख कोटी रुपये थेट जनतेच्या खात्यात जमा

## पीएम नरेंद्र मोदींनी जाहीर केली आकडेवारी

**नवी दिल्ली–** राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर आभार व्यक्त करताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जनतेचेही आभार मानले. जनतेने आभार व्यक्त करण्याची संधी दिली. म्हणून जनतेचं आभार मानतो असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. सरकारने ४० लाख कोटी रुपये थेट जनतेच्या खात्यात जमा केले असं सांगत संसदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध योजनांची आकडेवारी जाहीर केली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांवर जोरदार निशाणा साधला.

बचत भी, विकास भी अशी आमची काम करण्याची पद्धत आहे. जन धन, आधार ही जैन त्रिमूर्ती निर्माण केली, जनतेचा पैसा जनतेसाठी वापरला. डीबीटीद्वारे ४० लाख कोटी रुपये थेट जनतेच्या खात्यात जमा केले. आयकरात सवलत देऊन मध्यमवर्गीयांची देखील मोठी बचत करण्यात आली आहे. पूर्वी २ लाखांवर देखील आयकर आकारला जायचा. आता आम्ही १२ लाखांचे उत्पन्न करमुक्त केले आहे. सरकारी कार्यालयातील भंगार विकून २ हजार कोटी रुपये मिळवले. दहा वर्षात कुठलाही गैरव्यवहार झालेला नाही. अनेक खासदारांनी आपले विचार मांडले. साहजिकच काही नकारात्मक प्रतिक्रिया सुद्धा उमटल्या. महाकुंभपासून चीनवर सुद्धा आपल्या प्रतिक्रिया दिल्या. विकसित भारतासाठी नव्याने विश्वास व्यक्त केला. २१ वं शतक २५% टक्के समाप्त होत आहे. हे शतक भारताचंच असणार आहे. यासाठी जमिनी स्तरावर बदल पाहायला मिळत आहे.देशातील जनतेने मला १४ वेळा येथे प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. पाच दशकांपर्यंत फक्त गरिबी हटवण्याचे नारे ऐकले. आता २५ कोटी नागरिक गरिबीतून बाहेर पडले आहेत. योजनांचे योग्य नियोजन करुन अगदी सन्मानपूर्वक यांना गरिबीतून बाहेर काढण्यात आले. आम्ही गरिबांना खोटी आश्वासने दिली तर त्यांना विकासाच्या मार्गावर आणले. आम्ही गरिबांच्या समस्या आणि मध्यमवर्गीयांची समस्या जाणून घेतल्या. अशा लोकांना मदत करण्यासाठी मनात जिद्द असावी लागते. मात्र, काही लोकांमध्ये अशी जिद्द नव्हती, असा टोला पंतप्रधान मोदींनी विरोधकांना लगावला.

गरिबांना ४ कोटी घरं मिळाले. ज्यांनी आयुष्य जगलं आहे त्यांना पक्क्या घराची किंमत कळेल. एक महिला उघड्यावर शौचास जाण्यास जाताना पहाटे उजाडण्याआधी जाते. रोजचे नित्यक्रम करताना देखील अडचणीचा सामना करावा लागतो.

# ॲग्रीस्टॅक नोंदणीत नगर राज्यात दुसऱ्या क्रमांकावर

## दोन लाख शेतकऱ्यांना मिळाली नवीन ओळख

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** शेतकऱ्यांना वेगळी ओळख देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या ॲग्रीस्टॅक योजनेत शेतकऱ्यांची नोंदणीत अहिल्यानगर जिल्हा राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे. आतापर्यंत जिल्ह्यात दोन लाख शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. राज्यात सध्या प्रथम क्रमांकावर जळगाव जिल्हा आहे.

केंद्र व राज्य सरकारकडून शेतकऱ्यासाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांमधील गोंधळ कमी करण्यासाठी, तसेच त्यांना युनिक ओळख करून देण्यासाठी ॲग्रीस्टॅक योजना सुरू करण्यात आलेली आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी योजना सुरू करण्यास सांगण्यात आले होते. मात्र, आचारसंहितेमुळे काम सुरू होऊ शकले नव्हते. शेतीच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी ॲग्रीस्टॅक या योजनेत नावनोंदणी करणे शेतकऱ्यांना अनिवार्य आहे. राज्य पातळीवर कृषी सहायकांनी टाकलेल्या बहिष्कारानंतर या योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. मात्र, आता महसूल विभागाने कृषी सहायकांविनाच ही योजना राबविण्यास सुरुवात करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी जवळच्या सीएससी सेंटरमध्ये फार्मर आयडीसाठी अर्ज दाखल करावेत. नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्यात येत आहेत. यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. शेतकऱ्यांकडून पैशाची मागणी केल्यास कारवाई करण्यात येणार आहे, असे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**महसूलचा एकला चलोचा नारा**

राज्यात तलाठी, कृषी सहायक व ग्रामसेवकांच्या समन्वयाने ही योजना राबवण्यात येत आहे. परंतु, योजनेवर ग्रामसेवक व कृषी सहायकांनी बहिष्कार टाकलेला आहे. महसूल प्रशासनाचे काम सुरू आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी कृषी तर काही ठिकाणी ग्रामसेवकांचा योजनेच्या कामावर बहिष्कार असल्याची चर्चा आहे.

**सीएसीसी सेंटरमध्ये नोंदणी सुरू**

शेतकऱ्यांना ओळखपत्र मिळण्यासाठी सीएससी सेंटर मार्फत नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. सीएससी सेंटर मार्फत १ लाख ९३ हजार ६८३ शेतकऱ्यांची नोंदणी झालेली आहे. यात श्रीगोंदा १५,३८३. नगर १५,९२३. संगमनेर १७,९२१. जामखेड ८,७१९. कर्जत ८,८३२. पाथर्डी १७,४९८. राहुरी १९,७४७. नेवासा २२,३७२. शेवगाव १७,३६२. कोपरगाव ७,१८६. पारनेर ११,६५२. अकोले १०,२६५. राहाता १०,५५३ आणि श्रीरामपूर१०,२७० असा आहे.

# श्रीरामपुरात अतिक्रमणधारक उद्ध्वस्त, पतसंस्थांच्या दैनंदिन ठेवीत घट

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** श्रीरामपूर शहरातील मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमणे उद्ध्वस्त करण्यात आल्याने शहरातील व्यवहार थंडावले आहेत. या अतिक्रमणधारकांना भवितव्याचा प्रश्न सतावतोय. त्यात पतसंस्थांच्या दैनंदिन ठेवी कमी झाल्याने तसेच कर्ज वसुली थंडावल्याने पतसंस्था अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सावकारशाहीच्या शोषण व्यवस्थेतून लहान लहान दुकानदारांना सोडण्याचे कार्य पतसंस्थांनी केले आहे.पतसंस्थांकडून कर्ज सहजतेने उपलब्ध होत असल्याने समृद्धीकडे जाण्यासाठी पतसंस्था हा चांगला पर्याय आहे. पतसंस्था सर्वस्पर्शी आहेत. स्वाभाविकच शहरात अनेक सहकारी पतसंस्था आहेत आणि त्या तेथील दैनंदिन जीवनाचा एक भाग बनल्या आहेत. पतसंस्थेच्या यशस्वी अर्थकारणात महिलांचे योगदान लक्षणीय आहे. प्रत्येक दुकानदार, फेरीवाले व अन्य व्यावसायिक पै पै गोळा करून त्यातील काही भाग पतसंस्थांमध्ये दैनंदिन ठेवीच्या रूपाने ठेवत असतात. पण गत पाच–सहा दिवसांपासून सुरू असल्याने दुकानेच तोडण्यात अथवा काढण्यात आल्याने दुकानदारांची आवक बंद झाली आहे. त्यातच मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने त्यांच्यापुढे भवितव्याचा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे.

व्यवसाय बंद असल्याने पैशाची आवक नसल्याने दैनंदिन ठेवींमध्येही मोठ्या प्रमाणात कपात झाली आहे. शहरात अनेक पतसंस्था आहेत. त्यांचे दैनंदिन ठेवी गोळा करणारे शेकडो प्रतिनिधी आहेत. हे प्रतिनिधी दुकानदारांकडे चकरा मारत आहेत. पण सर्वकाही उद्ध्वस्त झाल्याने त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. पतसंस्थांकडून अनेक दुकानदारांनी कर्ज घेतलेले आहे. त्याच्या हप्त्यासाठी प्रतिनिधींकडून विचारणा केली जात आहे. पण आवकच नसल्याने पैसे द्यायचे कोठून? असा सवाल दुकानदारांकडून केला जात आहे. याप्रकरणी शहरातील काही पतसंस्थांनी काही दिवसतरी 'सबुरी'चे धोरण घेतले आहे.

# प्रवीण दराडे सहकार विभागात १३ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई (प्रतिनिधी)–** भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारकडून सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे सत्र सुरूच असून मंगळवारी १३ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या आदेशानुसार पर्यावरण विभागातून बदली झाल्यापासून नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेले ज्येष्ठ सनदी अधिकारी प्रवीण दराडे यांची बदली सहकार आणि पणन विभागात प्रधान सचिव म्हणून केली आहे. सध्या सहकार विभागाचा अतिरिक्त कार्यभार नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा यांच्याकडे आहे. दराडे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील अधिकारी ओळखले जातात.

भारतीय प्रशासकीय सेवेतील २००२ च्या तुकडीचे अधिकारी असलेले पंकज कुमार यांची नियुक्ती सामान्य प्रशासन विभागात सचिव आणि विशेष चौकशी अधिकारी २ म्हणून करण्यात आली आहे. राज्य मानवी हक्क आयोगाचे सचिव नितीन पाटील यांची बदली नवी मुंबईत कौशल्य विकास विभागाच्या आयुक्तपदी झाली आहे. राज्यपालांच्या सचिव या पदावर कार्यरत असलेल्या श्वेता सिंघल यांची बदली अमरावती विभागीय आयुक्त म्हणून करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागातील विशेष चौकशी अधिकारी–२ डॉ. प्रशांत नारनवरे यांची बदली राज्यपालांचे सचिव म्हणून झाली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल भंडारी यांची बदली माहिती तंत्रज्ञान विभागाचे संचालक म्हणून झाली आहे. कौशल्य विकास विभागाचे आयुक्त पी. के. डांगे यांची बदली राज्य मानवी हक्क आयोगाचे सचिवपदी करण्यात आली आहे. शुल्क नियामक प्राधिकरणाचे सचिव एस. राममूर्ती यांची बदली राज्यपालांचे उपसचिव म्हणून झाली आहे. तर नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांची बदली राज्य कर सहआयुक्त म्हणून छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आली आहे. राज्य कर सहआयुक्त मिलिंदकुमार साळवे यांची बदली अल्पसंख्याक विकास आयुक्त छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आली आहे.

सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक राहुल कर्डीले यांची बदली नांदेडचे जिल्हाधिकारी म्हणून तर कल्याण –डोंबिवली स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी माधवी सरदेशमुख यांची बदली व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण विभागाच्या संचालकपदी झाली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील चार्मोशी उपविभागाचे सहाय्यक जिल्हाधिकारी अमित रंजन यांची बदली यवतमाळ जिल्ह्यात पांढरकवडा येथे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प म्हणून करण्यात आली आहे.

## पान १ वरुन

### साई संस्थानने कर्मचाऱ्यांच्या कामाचा वेळा बदलल्या

वेळेत बदल होणार नाही. याशिवाय प्रसादालय, शैक्षणिक संस्था यांच्या वेळा पूर्वीप्रमाणे राहतील असे संस्थानने काढलेल्या परीपत्रकात म्हटले आहे.

### दुहेरी हत्याकांडातील पसार आरोपीही जेरबंद

पकडले आहे. याप्रकरणी श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे यांनी माध्यमांना माहिती दिली आहे.

### पोलीस निरीक्षक कुंभार यांची तडकाफडकी बदली

दुहेरी हत्याकांडात साई संस्थांनच्या दोन कर्मचाऱ्यांचे प्राण गेले. त्यामुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. घटनेतील मुख्य दोन्ही आरोपी शिर्डीतील गणेशवाडी येथे दुसऱ्याच्या जागेत राहतात. ही दुर्दैवी घटना घडल्यानंतर सोमवारी आरोपी राहतात तेथील मूळ मालकाने त्यांना घर खाली करण्यास सांगितले होते. परंतू त्यांनी ते घर खाली न केल्याने मंगळवारी सकाळी जागा मालकाने जेसीबी आणून त्यांना ते घर खाली करण्यास सांगितले. परंतू आरोपींच्या नातेवाईकांनी घर खाली करण्यास नकार देऊन मोठा गोंधळ घातला. त्यामुळे जमीन मालकांनी त्यांना त्यांचे घर खाली करण्यासाठी आणखी एक दिवसाची मुदत दिली असल्याचे समजते. सोमवार घडलेल्या घटनेनंतर उशीर का होईना पण पोलिस ॲक्शन मोडवर आल्याने अनेक गुन्हेगारांनी शिर्डीतून पलायन केले आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर शिर्डीतील सर्वपक्षीय ग्रामस्थांनी शासकीय विश्रामगृह येथे ग्रामसभा घेण्यासंदर्भात बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत शिर्डीतील गुन्हेगारी तसेच अवैध व्यवसायांचा कायमचाच बिमोड करण्यासंदर्भात ग्रामस्थांनी मते मांडली.

### अहिल्यानगरला डे केअर किमोथेरपी सेंटर सुरू करणार

राबविण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान महाराष्ट्रातील ३० वर्षावरील लोकांचे मौखिक, स्तन व गर्भाशयमुख कर्करोग तपासणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या मोहीमेंतर्गत राज्यात निदान झालेल्या सर्व कर्करोग रुग्णांना आवश्यक उपचार विनामूल्य मिळण्यासाठी स्थानिक व जिल्हा पातळीवर कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या उपचारादरम्यान कर्करोग रुग्णांना डे केअर सुविधा उपलब्ध केली जाणार आहे.

सध्या राज्यामध्ये १४ जिल्ह्यांमध्ये डे केअर केंद्र आहेत. त्यामुळे उर्वरित जिल्ह्यांतील रुग्णांना डे केअर सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी पुढील एक ते दोन महिन्यांमध्ये सर्व जिल्ह्यांमध्ये डे केअर केंद्र सुरू करण्यात येणार आहेत. ठाणे, सोलापूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, वर्धा या सहा जिल्ह्यांमध्ये कर्करोग रुग्णांसाठी डे केअर किमोथेरपी सेंटर सुरू करण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे.

राज्यस्तरीय कर्करोग तपासणी आणि जनजागृती मोहीमम यशस्वी होण्यासाठी सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी (मनपा) यांनी आपापसांत समन्वय साधून मोहीम व कर्करोगाबाबत नागरिकांमध्ये आकाशवाणी, वृत्तपत्रे, केबल इत्यादी माध्यमांतून जनजागृती करण्यात यावी, अशा सूचना आरोग्य विभागाने दिल्या आहेत. तसेच यामध्ये इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए), इंडियन डेंटल असोसिएशन (आयडीए), रोटरी क्लब, लायन्स क्लब, महाराष्ट्र कॅन्सर वॉरियर्स या खासगी संस्थांना सहभागी करून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### उपचार घेणाऱ्या तिघा जीबीएस संशयित रुग्णांची प्रकृती स्थिर

वाकोडी येथील तर तिसरा आष्टी येथील आहे. तिघांची प्रकृती आता स्थिर असून जिल्हा आरोग्य विभाग आणि मनपा आरोग्य विभाग परिस्थितीवर लक्ष ठेवू नसल्याचे सांगण्यात आले.

### माध्यमिक शिक्षक सोसायटीसाठी ९ हजार १५२ मतदार!

विधानसभा निवडणूका झाल्या. यामुळे जिल्ह्यातील ४२५ सहकारी संस्थांच्या निवडणूका लांबल्या होत्या. मात्र, चालू वर्षी राज्य सरकार विभागाच्या आदेशाने रखडलेल्या या सहकारी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम सुरू झाला आहे. यातील बहुतांशी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम सहकार विभागाच्यावतीने हाती घेण्यात आला आहे. यातील महत्वाची संस्था असणाऱ्या माध्यमिक शिक्षक सोसायटीची अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. आता पुढील टप्प्यात निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्त करण्यात येवून राज्य सहकार विकास प्राधिकरण यांच्याकडे सोसायटीच्या निवडणुकीचा कार्यक्रम तयार करून तो मान्यतेसाठी पाठवण्यात येणार आहे. ही मान्यता मिळताच माध्यमिक शिक्षक सोसायटीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात येणार आहे.

### अर्बन बँकेच्या पाच लाखांवरील ठेवीदारांना ५० टक्के रक्कम मिळणार

सादर करताना बँकेत पाच लाखाच्या पुढे रक्कम ठेव म्हणून ठेवलेल्या ठेवीदारांना ५० टक्के रक्कम म्हणजे ११० कोटी रूपये साधारणपणे मार्च वा एप्रिलमध्ये वाटप होवू शकते व यासाठी आवश्यक असलेले डिपॉझिट गॅरंटी कॉर्पोरेशनचे ना–हरकत प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे सांगितले. ठेवीदारांचे २२० कोटी देणे असून, त्यापैकी ५० टक्के म्हणजे ११० कोटी डिपॉझीट कॉर्पोरेशनच्या परवानगीने तातडीने दिले जातील तसेच उर्वरित ११० कोटीचे वाटप लवकर करण्यासाठी काही कर्जदारांच्या मालमत्ता तातडीने ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न केले जातील. मोठ्या कर्जदारांवर पोलीस प्रशासनाकडून अपेक्षित कारवाई झाली तर ती रक्कम देखील लवकरच ठेवीदारांना मिळेल, असे बँक प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आल्यावर पालकमंत्री विखे यांनी तातडीने त्रिसदस्यीय समिती स्थापन करून व या समितीच्या माध्यमातून सर्व कारवाई जलद वेगाने करून ठेवीदारांना ठेवी लवकरच पूर्ण परत करण्याचे नियोजन करण्याचे आदेश दिले आहे, असेही पत्रकार परिषदेत सांगितले गेले.

**प्रशासनाकडून असहकार्य**

आरोपींच्या मालमत्तांची माहितीच मुद्रांक नोंदणी विभागाकडून पोलीस वा जिल्हा प्रशासनाला दिली जात नाही, असा गंभीर आरोप बँक बचाव समितीव्दारे यावेळी केला गेला. थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करून त्यांचे लिलाव करण्याचे ७० प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहेत. ते चार–पाच दिवसात मार्गी लावण्याची ग्वाही त्यांनी पालकमंत्री विखे पाटील यांना दिली आहे. गुन्हे दाखल झालेल्या आरोपींच्या मालमत्ता जप्तीसाठी पोलिसांनी मागितलेली माहितीच नोंदणी विभागाकडून दिली जात नाही. ते सहकार्य करीत नाहीत व पोलिसांनाही दाद देत नाहीत, असा दावाही समितीने केला. आरोपींच्या ११८ मालमत्तांची माहिती मिळाली असून, त्यापैकी ९६ मालमत्तांच्या जप्तीचे प्रस्ताव ऑक्टोबर २०२४ पासून प्रलंबित आहेत. बँकेत २० टक्के लॉकर बेनामी असून, ते अजूनपर्यंत उघडले गेलेच नाहीत व त्यात काय आहे, हे स्पष्ट केले गेले नाही, असा दावाही समितीने केला.

**ठेवीदारांसाठी आशेचा किरण**

नगर अर्बन बँकेच्या सत्ताधारी संचालक मंडळाच्या भ्रष्ट कारभारामुळे ४ ऑक्टोबर २०२३ रोजी बँक बंद पडली होती. मात्र, फक्त १४ ते १५ महिन्यांच्या कालावधीत ठेवीदारांना पूर्ण रक्कम मिळण्याचे संकेत मिळत आहेत. बँक बचाव समितीचे राजेंद्र चोपडा, राजेंद्र गांधी, ॲड. अच्युत पिंगळे, डी. एम. कुलकर्णी, विलास कुलकर्णी, अवधूत कुक्कडवाल, अरविंद काळोखे, महेश जेवरे व इतर ठेवीदारांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे व कायदेशीर लढ्यामुळे हा मोठा विजय मिळाला आहे. बँकेचे डिपॉझिट गॅरंटी कॉर्पोरेशनची कर्जफेड पूर्ण करणे, सरकारी गुंतवणूक विक्री प्रक्रियेतील प्रगती, त्रिसदस्यीय समितीच्या माध्यमातून कर्ज वसुली, आणि मार्च २०२५ मध्ये ११० कोटींचे वाटप यामुळे ठेवीदारांना मोठा दिलासा मिळणार आहे. जर प्रशासनाने ठकबाज कर्जदारांवर कठोर कारवाई केली, तर उर्वरित १०० टक्के ठेवीही लवकरच परतफेड करता येईल, असा विश्वास बँक बचाव समितीने व्यक्त केला आहे.

# आशिष शेलारांच्या हस्ते २३ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट (पीफ) महोत्सव २०२५ चे उद्घाटन

**पुणे (प्रतिनिधी)–** २३ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट (पीफ) महोत्सव २०२५ चा उद्घाटन सोहळा श्री गणेश कला क्रीडा रंगमंच,स्वारगेट,पुणे,येथे १३ फेब्रुवारी २०२५ रोजी सायं ५ वाजता महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते संपन्न होईल, अशी घोषणा मंगळवारी महोत्सवाचे संचालक डॉ, जब्बार पटेल यांनी केली. दरम्यान, भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेत्री शुभा खोटे व ज्येष्ठ अभिनेते पद्मभूषण अनुपम खेर यांना पीफ डिस्टींग्वीश ॲवार्ड, तर ज्येष्ठ गायिका पद्मश्री कविता कृष्णमूर्ती यांना संगीत क्षेत्रातील योगदानासाठी संगीतकार एस. डी. बर्मन पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

याप्रसंगी ज्येष्ठ चित्रपट समीक्षक व चित्रपट निवड समितीचे अध्यक्ष समर नखाते, चित्रपट निवड समितीचे सदस्य अभिजीत रणदिवे, उपसंचालक विशाल शिंदे (प्रोग्रॅम व फिल्म), उपसंचालक अदिती अक्कलकोटकर (आंतरराष्ट्रीय संपर्क व समन्वय) उपस्थित होते. पुणे फिल्म फाउंडेशन, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन व दादासाहेब फाळके चित्रनगरी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महोत्सवाचे आयोजन केले जाते. यंदाची थीम ही मशो मॅन ; राज कपूरफ्र जन्मशताब्दी आहे.

यंदा प्रख्यात चर्मवाद्यवादक विजय चव्हाण आणि सहकारी यांच्या वादनाने उद्घाटन सोहळ्याची सुरुवात होईल .उद्घाटन सोहळ्यानंतर Gloria, Country: Italy, Switzerland ,Dir : Margherita Vicario हा उद्घाटनाचा चित्रपट (ओपनिंग फिल्म) म्हणून दाखवण्यात येणार आहे, तर The Room Next Door ,Country: Spain ,Dir: Pedro Imodovar या चित्रपटाने महोत्सवाची (क्लोजिंग फिल्म) सांगता बालगंधर्व रंगमंदिर येथे होणार असल्याचे डॉ. पटेल यांनी सांगितले.

यावेळी महोत्सवाच्या आंतरराष्ट्रीय ज्यूरींच्या नावाची घोषणा अभिजित रणदिवे यांनी केली. यामध्ये मार्को बेकिस – चिली–इटालियन चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथा लेखक, मार्गारिवा शिल – पोर्तुगीज चित्रपट दिग्दर्शक आणि शिक्षिका,पेट्री कोटविचा – फिनिश चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथा लेखक , तामिन्हे मिलानी – इराणी चित्रपट दिग्दर्शक , जॉर्जे स्टिचकोविच – सिनेमॅटोग्राफर सर्बिया, सुदथ महादिवुलवेवा – श्रीलंकन चित्रपट दिग्दर्शक, अर्चना – दक्षिण भारतीय अभिनेत्री,अनिरुद्ध रॉय चौधरी – भारतीय चित्रपट दिग्दर्शक यांचा समावेश आहे.

समर नखाते म्हणाले या महोत्सवात फिल्म सिटीच्या एमडी – स्वाती म्हसे पाटील यांचे चर्चासत्र – १४ फेब्रुवारी आणि प्रसिद्ध माहितीपट दिग्दर्शकांशी चर्चा (उमेश कुलकर्णी, अनुपमा श्रीनिवासन, सर्वनिक कौर, कुलदीप बर्वे – १५ फेब्रुवारी) हे वर्कशॉप होणार आहेत.

# नगर जिल्ह्यातील उशीराच्या जन्म-मृत्यू नोंदी थांबवल्या

## राज्य पातळीवरून जिल्हा प्रशासनास आदेश

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** राज्यातील काही जिल्ह्यात जन्म आणि मृत्यूच्या उशीराच्या नोंदीबाबत तक्रारी वाढल्या होत्या. राज्यात उशीराने होत असलेल्या जन्म आणि मृत्यूच्या नोदींची माहिती तपासण्यासाठी एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. यामुळे पुढील आदेश मिळेपर्यंत राज्यातील सर्व जिल्ह्यातील जन्म आणि मृत्यूच्या नोंदी करण्याचे थांबवण्यात यावे, असे आदेश राज्य सरकारच्या महसूल विभागाचे उप सचिव यांनी सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

गेल्या काही महिन्यात राज्यातील काही जिल्ह्यात उशीराने होणाऱ्या जन्म आणि मृत्यूच्या नोंदीवर संशय व्यक्त करण्यात आला होता. एक ते सहा महिने उशीराने होणाऱ्या जन्म–मृत्यूच्या नोंदीत मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेल्याचा आरोप आहे. सरकारने देखील ही बाब गंभीरपणे घेतली आहे. सरकारचा जन्म–मृत्यू कायदा १९६१ यामध्ये सुधारणा करून उशीराच्या जन्म व मृत्यूच्या नोंदी संबंधीतचे अधिकार हे जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी यांना प्रदान करण्यात आले होते. यानंतर या नोंदी करतांना मोठ्या प्रमाणात चुकीचे प्रकार घडल्याच्या तक्रारी राज्य सरकारकडे आल्या. या चुकीच्या प्रकाराच्या तपासासाठी राज्य पातळीवर विशेष तपासणी पथक एसआयटी स्थापन करण्यात आलेली आहे. ही एसआयटी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील गेल्या काही महिन्यांतील उशीराच्या जन्म आणि मृत्यूच्या नोंदीची तपासणी करणार आहे. यामुळे सरकारच्या पुढील आदेशापर्यंत जिल्ह्यातील उशीराच्या जन्म आणि मृत्यूच्या नोंदी थांबवण्यात आल्या आहेत. याबाबतचे आदेश जिल्हा पातळीवर महसूल आणि आरोग्य विभागाला प्राप्त झालेले आहेत.

## इंदुबाई लबडे यांचे निधन



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील फत्याबाद येथील इंदुबाई राधुजी लबडे (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दीर, मुले–मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. येथील सोसायटी सदस्य प्रकाश तसेच बाळासाहेब, बापूसाहेब यांच्या त्या मातोश्री होत.

## प्रभाकर कळमकर यांचे निधन



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** येथील गणेश कॉलनी सूतगिरणी रोड (दत्तनगर) येथील प्रभाकर भगवंता कळमकर (वय ७७) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. साईसमर्थ टेम्पो सर्विसेसचे संजय कळमकर यांचे ते वडील होत.

## सूर्यभान लांडगे यांचे निधन

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** पिंपळगाव लांडगा (ता. अहिल्यानगर) येथील ज्येष्ठ समाजिक कार्यकर्ते व प्रगतिशील शेतकरी सूर्यभान सावळेराम लांडगे (वय ८४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. विठ्ठलराव लांडगे, जिल्हा ऑडिटर संघटनेचे अध्यक्ष पांडुरंग लांडगे यांचे वडील तसेच बाळासाहेब परभणे यांचे ते सासरे होत.

